# Quadrant II – Notes

**Programme:** BA

**Subject:** Marathi

**Paper Code:** MRC-110

**Paper Title:** **Literary Criticism (साहित्यसमीक्षा)**

**Unit:** साहित्य समीक्षेचे स्वरुप व विविध पद्धती

**Module Name**: आस्वादक व स्त्रीवादी समीक्षा पद्धती

**Module No:** **04**

**Name of the Presenter: Dr. Geeta Yerlekar**

---

साहित्यसमीक्षा ही एक ज्ञानशाखा आहे. तिच्यात साहित्यविचार, सौंदर्यशास्त्राच्या अनुशंगाने साहित्यविचार , साहित्यविषयक सिद्धांत, समीक्षाव्यूह आणि उपयोजित समीक्षा यांचा समावेश होतो. आधुनिक काळात वेगवेगळ्या समीक्षा पद्धतींचा उदय झाला. त्यापैकी आस्वादक व स्त्रीवादी समीक्षापद्धतींचा विचार याठिकाणी अपेक्षित आहे.

<u>आस्वादक समीक्षापद्धती</u>

आस्वादक समीक्षेचा उदय रोमँटिक प्रवृत्तीशी निगडित आहे. आस्वादक समीक्षेमागे संस्कारवादी भूमिका आहे. विज्ञान ज्ञान किंवा संदेश देते. कला मात्र व्यक्तिगणिक वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटवते. असे या समीक्षेत गृहित धरले जाते. आस्वादक समीक्षा हा साहित्याची उपयोजित समीक्षा कसी करावी यासंबंधीचा एक दृष्टिकोन आहे. आस्वादक समीक्षेला काव्यात्मक टीका असेही म्हटले जाते. वाचकांच्या, रसिकांच्या मनःपटलावर उमटलेला ठसा हिच या समीक्षेची अभ्यास सामग्री असते.

उद्दिष्ट्येः

साहित्यकृती मनावर जे संस्कार घडविते त्याचे दर्शन घडविणे. कलाकृतीच्या अनुभवाचा अनुभव इतरांसमोर ठेवणे. अनुभूतीच्या एका क्षणाला कलेच्या माध्यमातून स्थायी रुप देणे. रसग्रहण करणे, कलावंताच्या कलाकृतीला पूर्णता देणे. कलाकृतीतील सौंदर्यस्थळे वाचकाच्या नजरेस आणणे.मूळ कलाकृतीचे सौंदर्य वाढविणे. आस्वादक टीकेत टीकाकार कवीच्या अपूर्ण कल्पना त्याच्याच पद्धतीने पूर्ण करुन काव्याचा आशय स्पष्ट करीत असतो. वॉटर पेटरने टीकेला निर्णय न म्हणता appreciations म्हटले आहे. ऑस्कर वाईल्डने I would call criticism creation with in creation असे वर्णन केले आहे. स्वानंदासाठी कलाकृतीचे रसग्रहण करणे, समीक्षकाचे व्यक्तिमत्त्व त्यात विरघळून जाणे, त्याने कोऱ्या मनाने कलाकृतीतील अनुभवाशी समरस होणे आणि आपल्या मनावर झालेला संस्कार व्यक्त करणे ही आस्वादक समीक्षेमागील गृहीतकृत्ये आहेत.

- मराठीत आस्वादक समीक्षेविषयी बरीच चर्चा झालेली आहे.

वा. ल. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, माधव आचवल, रा.भा.पाटणकर, रा. शं. वाळिंबे, श्री.के क्षीरसागर या समीक्षकांनी साहित्यकृतीचे अंतरंग उकलून दाखविले. साहित्याकडे पाहण्याची मर्मदृष्टी दिली. माधव आचवल यांच्या मते, सौंदर्यनिर्मिती व सौंदर्याचा रसास्वाद यांचा मूलस्त्रोत एकच आहे. दोन्हीही आस्वाद घेण्याच्या वृत्तीचाच भाग आहेत. वस्तूच्या सौंदर्यरुपाचा आस्वाद घेणे हा रसिकाचा धर्म, हाच रसास्वादाचा गाभा आहे. कलाकृतीच्या रसास्वादाचा विचार, चांगला रसास्वाद ही एक नवनिर्मित कलाकृतीच असते या जाणिवेशी येऊन थांबतो.

- गंगाधर गाडगीळ यांनी साहित्यसमीक्षेच्या तीन प्रमुख शाखा मानल्या

१. तत्त्वचर्चा

२. वाङ् मयीन प्रवृत्तींचे विश्लेषण

३. विशिष्ट साहित्यकृतीचा रसास्वाद

यापैकी आस्वादक समीक्षा ही सर्व समीक्षेचा पाया आहे असे ते मानतात. प्रत्येक साहित्यकृतीला स्वतःचं असं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असतं. कुठच्याही वर्गीकरणात अगर साहित्यविषयक संकल्पनाव्यूहात ती चपखल बसत नाही.आस्वादक समीक्षेत महत्त्व असतं ते पुस्तकाच्या मनावर होणाऱ्या संस्काराच्या निरिक्षणाला आणि नोंदीला. हा संस्कार मोकळ्या मनानं स्वीकारला गेला पाहिजे.

वैशिष्ट्ये

आस्वादक टीका हा विधायक टीकेचा प्रकार आहे. साहित्यकृतीतील अज्ञात गूढसौंदर्याचा वेध घेण्याचे सामर्थ्य तिच्यात असते.श्रेष्ठ कलाकृती व तितक्याच तोलामोलाचा मर्मज्ञ आस्वादक सम-समासंयोग आस्वादकामुळे ही समीक्षा एक उंची गाठू शकते. अशी टीका कोणत्याही स्वतंत्र कलाकृती इतकीच श्रेष्ठ मानली पाहिजे. कलावंताची कला ही जर निर्मिती असते. तर आस्वादक पद्धतीने केलेली समीक्षा ही पुनर्निर्मितीच म्हणावी लागेल.

मर्यादा

तुलना, मूल्यमापन, गुणदोषासंबंधीचा निर्णय, तार्किकता, बौद्धिकता आणि शास्त्रीय भूमिका किंवा शिस्त या सर्वच गोष्टी आस्वादक समीक्षेला मान्य नाहीत. अनेक अभ्यासकांचा या समीक्षेला विरोध आहे. आस्वादक टीका पुनर्निर्माण कला असेल तर समीक्षेला कला म्हणण्यात अडचणी. मूळ कलाकृती बाजूला राहून टीकाकार त्या काव्यामुळे जागृत होणाऱ्या स्वतःच्या भावनात रंगून जातो. त्यामुळे समीक्षा अधिक व्यक्तीगत होते. आस्वाद आणि समीक्षा या दोन गोष्टी वेगळ्या ठरतात.

- स्त्रीवादी समीक्षा

२० व्या शतकात स्त्रीवादी विचारसरणीचा जन्म झाला. साहित्याच्या आणि समीक्षेच्या प्रांतातही ही विचारसरणी विशेष फोफावली. जीवनवादाशी नाते सांगणारी पद्धती आहे. व्यवस्थेने घालून दिलेली चौकट उद्ध्वस्त करुन ‘स्व’ च्या अस्तित्वाचा शोध.

समाजातील अनिष्ठ रुढी, परंपरा यांना धक्के देऊन आपल्या अस्तित्वासाठी बंडाचे निशाण उभारुन प्रस्थापित व्यवस्थेला नाकारुन विद्रोहाची भूमिका घ्यावी अशी ही समीक्षा मानते. स्त्रीवादी समीक्षा पुरुषप्रधान व्यवस्था व लिंगभेदाविषयीच्या राजकारणाशी असलेल्या लढ्याविषयीचा समीक्षात्मक व्यवहार आहे. समीक्षाव्यवहारातील पुरुषप्रधान व्यवस्थेचे लिंगभेदाचे राजकारण उगड करुन दाखविणे हे स्त्रीवादी समीक्षेचे उद्दिष्ट आहे. स्त्री साहित्याचा आशय, विषय, शैली या सर्व बाबींचा शोध स्त्रीवादी दृष्टिकोनातूनच घ्यायला हवा.

स्त्रीविषयक सिद्धांतनाच्या पातळ्या

स्त्रीवादी समीक्षेच्या तात्त्विक भूमिकेचा शोध घेताना आढळणारे पहिले प्रमेय म्हणजे स्त्रीविषयीच्या सिद्धांतनाच्या किमान तीन पातळ्या निश्चित करुन त्यांच्यातील परस्परसंबंध तपासणे. 'स्त्री' या संकल्पनेविषयीचे सिद्धातन करताना अपरिहार्यपणे पहिली पातळी शारीर  वा जैविक भेदाची मानावी लागते. नर आणि मादी यांची शरीररचना निसर्गानेच भिन्न ठेवलेली आहे. परंतु बऱ्याचदा या शारीर वा जैविक भेदाची गल्लत सामाजिक-सांस्कृतिक भेदाशी केली जाते. स्त्रीत्वाची संकल्पना ही समाजाने घडविलेली असते.जैविक पातळीवर मादीपणा, सामाजिक-सांस्कृतिक पातळीवर स्त्रीत्व आणि राजकीय पातळीवर स्त्रीवाद या तीन पातळ्या एकमेकींपेक्षा वेगळ्या आहेत आणि तरीही एकमेकींशी संबंधित आहेत. हे स्त्रीवादी विचारसरणीचे एक मुलभूत तत्त्व आहे. स्त्रीविषयीच्या सामाजिक–सांस्कृतिक अपेक्षांना मूर्त स्वरुप मिळते ते मिथ्यकथांमध्ये व साहित्यकृतींमध्ये. मिथ्यकथांमध्ये व साहित्यामध्ये स्त्रियांच्या ज्या प्रतिमा मूर्त झालेल्या असतात त्याच्यावरुन समाजाने स्त्रीविषयी कोणता साचा तयार केला आहे त्याचा अभ्यास करता येतो. पुरुषाशी तुलना करता स्त्रीमध्ये काही गुणांचा अभाव आहे. हे पुरुषप्रधान विचारचौकटीचे एक लाडके प्रमेय आहे. स्त्रीविषयीचा अभाववादी दृष्टिकोन यातून समजतो. स्त्रियांमध्ये काही न्यून वा अभाव आहे आणि त्यातच तिचे स्त्रीत्व किंवा स्त्री म्हणून सत्व आहे, या दृष्टिकोनाची उदाहरणे कलेच्या संदर्भातही सापडतात. सीमॉन द बोव्हार या प्रख्यात फ्रेंच स्त्रीवादी लेखिकेने प्रथम या प्रश्नाला तोंड

फोडले. 'जन्मतःच कोणी स्त्री असत नाही. स्त्रीत्व हे समाजाने, संस्कृतीने घडविलेले असते.' असे तिचे प्रतिपादन आहे. सँड्रा गिल्बर्ट व सूसान ग्यूबर यांनी ऐतिहासिकतेवर आधारलेले स्त्रीवादी काव्यशास्त्र विकसित करण्याचा प्रयत्न केला. पुरुषप्रधान साहित्याचे विपरित वाचन केल्याशिवाय स्त्रीवादी काव्यशास्त्र उभे राहू शकणार नाही अशी जहाल स्त्रीवादी समीक्षेची धारणा आहे.अधिक खुले वाङ् मयीन आकारबंध, बंदिस्तपणाला आव्हान देणारे विचार, बंदिस्त विचारांना शब्दरुप देणाऱ्या अपूर्ण भाषेला दिलेला निरोप याची निकड.स्त्रीवादी समीक्षेमध्ये स्त्री दृष्टीतून साहित्याचे आकलन करणे, त्यादृष्टीने प्रतिसाद देणे आणि साहित्याचे मूल्यमापन महत्त्वाचे ठरते. स्त्रीवादी विचारांचा पाया व्हर्जिनिया वुल्फ, सिमॉन द बोव्हार यांच्या लेखनाने घातला. ऐलन शोवॉल्टरने 'फेमिनिस्ट क्रिटिसिझम इन द वाइल्डनेस' या लेखात स्त्रीवादी समीक्षेची तात्विक बैठक सांगितली आहे. स्त्रीवादी समीक्षेला तिने गायनोसेंट्रिक क्रिटिसिझम असे नामाभिधान दिले आहे. पुढील चार अंगे सांगितली.

१. स्त्रीशरीरनिष्ठ अनुभवांचे आकलन-जीवशास्त्रीय

२. स्त्रीनिष्ठ मनोविश्लेषण-मानसशास्त्रीय

३. स्त्रीकेंद्री भाषिक अभिव्यक्तीचे स्वरुप- भाषावैज्ञानिक

४. स्त्रीनिष्ठ सांस्कृतिक अनुभवविश्वाचे अर्थनिर्णयन

या प्रक्रियेतून संभवणाऱ्या समीक्षेला त्यांनी स्त्रीवादी समीक्षा असे म्हटले आहे. साहित्यकृतीच्या आशयाला महत्त्व, साहित्यकृतींद्वारे स्त्रीजीवनांचे पदर उलगडले.एलन शोवॉल्टरने स्त्रीकेंद्री समीक्षेचे दोन प्रकार सांगितले फेमिनाईन क्रिटिक, गायनोक्रिटिक

१. फेमिनाईन क्रिटिक

याला स्त्रीप्रधान समीक्षा म्हणता येईल. ही समीक्षा पारंपरिक साहित्याची वाचक या नात्याने स्त्री वाचक निर्माण करते. पुरुषांच्या साहित्याचे स्त्रीवादी वाचन ही या

समीक्षकाची भूमिका आहे. साहित्याचे पुनर्वाचन करताना व्यक्तिचित्रणाबरोबर कथानकाच्या संरचनेचाही विचार करते.

२. गायनोक्रिटिक

स्त्रीसाहित्याचे स्त्रीकेंद्री विश्लेषण करणारी भूमिका असून यात स्त्रियांच्या स्त्रीविशिष्ट अनुभवावर लक्ष केंद्रित केलेले दिसते. स्त्रीचे खास स्त्रीविशिष्ट अनुभवविश्व जैविक, भाषिक आणि मानसिक या स्तरावर स्वतंत्र होत असते. या स्त्रीविशिष्ट अनुभवांना एलेन शोवॉल्टर वाईल्ड झोन असे संबोधतात.

स्त्रीवादी समीक्षेचे महत्त्व

स्त्रीवादी समीक्षापद्धती ही स्त्रीवादाची एक परिणती आहे. पुरुषप्रधान जीवनादर्श नाकारताना ही जाणीव पुरुषप्रणीत सौंदर्यशास्त्रही नाकारते व समीक्षा व्यवहाराची नवी मांडणी करते. या समीक्षापद्धतीच्या उदयापूर्वीचे सर्व साहित्यसिद्धांतन पुरुषकेंद्री होते. परंतु स्त्रीवादी समीक्षेने साहित्यविश्लेषणात लिंगभाव ही एक मूलभूत वर्गवारी असते. ही जाणीव प्रथम करुन दिली.केवळ समीक्षेची एक पद्धत एवढाच स्त्रीवादी समीक्षेचा अर्थ लावणे मर्यादित होईल.

स्त्रीवादी समीक्षेपुढच्या समस्या

साहित्याच्या मूल्यमापनाचे नेमके कोणते निकष या समीक्षेला अभिप्रेत आहेत. त्याचा उलगडा व्हायला हवा. साहित्य हे स्त्रीवादी असायला हवे, पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करणारे असावे यापलीकडे आणखी कोणते निकष ही पद्धती सांगते स्त्री – वाचक म्हणजे नक्की कोण याचे उत्तर द्यायला हवे.

-